# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२–२२३१०४ E-Mail : registrar.gondwanauniversity@gmail.com

जा.क्र./गोंवीग/कुसका/१६७४/२०१६ दिनांक : ३१/०३/२०१६

## सूचना

### गोंडवाना विद्यापीठाच्या उन्हाळी २०१६ च्या परिक्षा वेळापत्रकाप्रमाणे

गोंडवाना विद्यापीठाच्या नियमित उन्हाळी–२०१६ च्या परिक्षेच्या वेळापत्रकाबाबत बदल करून परिक्षा पुढे घेण्याबाबत विविध विद्यार्थी संघटनांनी तसेच विद्यार्थी प्रतिनिधींनी निवेदने सादर केली. तसेच वर्तमानपत्रांमध्ये सुध्दा बातम्या प्रकाशित झाल्यात. त्याबाबतीत गोंडवाना विद्यापीठाव्दारा पुढील निवेदन करण्यात येत आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग आणि महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार, गोंडवाना विद्यापीठाने सत्र पध्दतीचा अवलंब केलेला आहे. या संदर्भात डॉ. राजेश अग्रवाल समितीने परिक्षा पध्दतीत सुधारणा करण्याची शिफारस केलेली आहे. त्यानुसार सदरहु निर्देशाचे गोंडवाना विद्यापीठ पालन करित आहे. उपरोक्त निर्देशानुसार, परिक्षेचे वेळापत्रक तयार करणे बंधनकारक आहे. सर्वच अभ्यासक्रमांसाठी परिक्षेचे आयोजन करण्यासाठी सर्वच घटकांचे सहकार्य आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेवून या परिक्षा वेळेवर सुरू करून वेळेवर निकाल लावण्याचा विद्यापीठ प्रयत्न करीत आहे. या परिक्षा सुरळीत पार पाडण्याचे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.

(डॉ.एस.एम.रोकडे)
कुलसचिव (प्रभारी)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली